INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 13 | ISSUE - 4 | MAY - 2023

# "इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना मराठी शुध्दलेखनात येणाऱ्या समस्यांचा शोध व उपाय"

डॉ. जी. व्ही. जैन
माजी सहाय्यक प्राध्यापक, शिववैभव शिक्षण महाविद्यालय, वर्धा.

## प्रास्ताविक :-



मातृभाषेचा जन्मापासून मानवी हावभावांची समर्थ अभिव्यक्ती भाषेव्दारे साधली जाते. मानवी जीवनात भाषेचे अनन्य साधारण महत्व आहे.आपली भाषा लहानपणापासून परिचयाची असल्यामुळे आपण तिला सर्वात जास्त महत्व देतो.

प्रत्यक्ष जीवनव्यवहाराशी संबंधित बाबी प्रतिबिंबित होण्यासाठी भाषा शुध्दतेत विशेष लक्ष द्यायला हवे, त्यामुळे विद्यार्थ्यांची सृजनशिल, अभिव्यक्ती, भाषासमृध्दी होऊन शुध्दलेखनात विकास घडवून येईल.

मुलांना कोणतेही शिक्षण द्यावयाचे असो ते प्राथमिक स्तरावर असतांना लवकर समजते ते दीर्घकाळ लक्षात राहते म्हणून विद्यार्थी हा प्राथमिक स्तरावर सुधारू शकतो. या स्तरात विद्यार्थ्यांचे शुध्दलेखन सुधारू शकते म्हणून संशोधकाने मराठी शुध्दलेखनात येणाऱ्या समस्यांचा शोध व उपाय या विषयाची निवड केली.

## संशोधनाची गरज :-

मराठी विषयातील कोणतेही लेखन करण्यासाठी शुध्दलेखन महत्वाचे मानले जाते. परंतु तत्कालीन शुध्दलेखनाच्या विषयात अनेक बदल झाले आहे. अनुस्वार, स्वर, ऱ्हस्व, दीर्घ यांच्या व्यवस्थेलाच स्थुलमानाने शुध्दलेखन हा शब्द वापरलेला आहे.

अर्ज, विनंत्या, निवेदने, तक्रारी, सुचना, जाहिरनामे, परिपत्रके, न्यायालयीन कामकाज करतांना मराठी शुध्दलेखन आवश्यक आहे. मराठी भाषा ही मातृभाषा असून सुध्दा दहावी, बरावीच्या परिक्षेत मुले मराठी या विषयात अनुत्तीर्ण होतात. याचे कारण म्हणजे विद्यार्थ्याच्या ऱ्हस्व, दीर्घ, जोडाक्षरे, अनुस्वार इ. बाबतीत होणाऱ्या चुकांमुळे निर्माण होणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी विद्यार्थ्यांना प्राथमिक स्तरावर शुध्दलेखनाचे नियम योग्य मार्गदर्शन व विविध उपक्रम राबवून शुध्दलेखन कशा प्रकारे लिहीता येईल याचे निरासन करण्यासाठी संशोधकाला या समस्येची गरज भासली.

## संशोधनाचे महत्व :-

इंग्रजीतून शब्द लिहितांना इंग्रजी शब्दांच्या स्पेलिंगविषयी आपण जेवढे जागरूक असतो, तेवढेच मराठी शुध्दलेखनात जागृत असणे गरजेचे आहे. कारण मराठी ही आपली मातृभाषा आहे. त्यामुळे भाषेची अस्मिता जपण्याचा शुध्दलेखनाच्या नियमानुसार एक भाग असतो.

मराठी शुध्दलेखन लिहिल्याने लेखन, टंकलेखन, मुद्रण इत्यादीचे लिखाण जलद होते. त्याशिवाय वाक्यांचा परस्पर संबंध संदर्भ लक्षात घेता, अर्थहानी ही होत नाही. विद्यार्थ्यांना जर शुध्दलेखानाचे कौशल्य अवगत झाले तर त्याचे मराठी विषयावरील प्रभुत्व वाढेल व व्यक्तीगत विकास देखील चांगला घडून आणता येईल.

## समस्या शीर्षक:-

"इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना मराठी शुध्दलेखनात येणाऱ्या समस्यांचा शोध व उपाय."

## संशोधन समस्येची उद्दिष्टये :-

हिंगणघाट तालुक्यातील सेलू येथील विकास विद्यालय या शाळेतील आठवीच्या विद्यार्थ्यांना मराठी शुध्दलेखनात येणाऱ्या समस्यांचा शोध व उपाय.

१. विद्यार्थ्यांना शुध्दलेखन करतांना येणाऱ्या अडचणींचा शोध घेणे.
२. लेखन शुध्द होण्यासाठी विविध उपक्रम राबविणे.
३. शुध्दलेखना संदर्भात उपक्रमांची अंमलबजावणी करणे.

## संशोधन समस्येची गृहीतके :-

१. मराठी हा विषय अभ्यासक्रमात प्रथम भाषा म्हणून अनिवार्य आहे.
२. भाषेमध्ये शुध्दलेखनाला अनन्य साधारण महत्व आहे.

## संशोधन समस्येची परिकल्पना :-

१. मराठी लेखन करतांना विद्यार्थ्यांच्या शुध्दलेखनात चुका होतात.
२. मराठी विषयामध्ये शुध्दलेखनाचा सराव दिल्यास विद्यार्थ्यांच्या लेखनातील शुध्दलेखनाच्या संदर्भातील चुका कमी होतात.

## संशोधन समस्येची निगडीत चले :-

१. स्वाश्रयी चले - शुध्दलेखनाचे विविध उपक्रम.
२. आश्रयी चले - उपक्रमाचे परिणाम.
३. मध्यस्थ चले - विद्यार्थी प्रकटीकरण.

## संशोधन समस्येतील कार्यात्कम व्याख्या :-

१. ***प्राथमिक शाळा*** – ज्या ठिकाणी इयत्ता पहिली ते आठवीचे वर्ग असतात व ६ ते १३ वर्ष वयोगटातील विद्यार्थी शिक्षण घेतात त्या शाळेस प्राथमिक शाळा म्हणतात.
२. ***माध्यम*** – संवादाची देवाणघेवाण ज्या भाषेतून होते त्यास माध्यम असे म्हणतात.
३. ***शुध्दलेखन***– शुध्दलेखनाच्या नियमांचा वापर करून केलेले लेखन म्हणजे शुध्दलेखन होय.
४. ***समस्या*** – विद्यार्थ्यांना लेखन करतांना येणारे अडथळे म्हणजे समस्या होय.
५. ***उपाय*** – शैक्षणिक समस्यांच्या निराकरणासाठी केलेले प्रयत्न म्हणजे उपाययोजना होय.
६. ***विविध उपक्रम*** – शुध्दलेखनाचे नियम, शुध्दलेखन उतारा, शुध्दलेखन स्पर्धा, विरामचिन्हांचा योग्य उपयोग, विद्यार्थ्यांना वेगवेगळया गटात बसवून लेखन.
७. ***मराठी शुध्दलेखन समस्या*** – मराठी शुध्दलेखन करतांना जोडाक्षर, ऱ्हस्व, दीर्घ, रफार, अनुस्वार, अर्धविराम, पुर्णविराम, अवतरण चिन्ह, स्वल्पविराम, शब्दचना इ. बाबतीत येणाऱ्या समस्या.

## संशोधनातील न्यादर्श/न्यादर्श निवडण्याची पध्दती:-

प्रस्तुत संशोधनात यादृच्छिक पध्दतीने निवड करून एका शाळेतील ५० विद्यार्थ्यांची प्रायोगिक संशोधनासाठी निवड करण्यात आली. विकास विद्यालय सेलू, ता. हिंगणघाट, जि. वर्धा येथील इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांची न्यादर्श म्हणून निवड केली.

## संशोधनाची पध्दती/माहिती संकलनाची साधने:-

प्रस्तुत संशोधन हे उपयोजित संशोधन आहे, कारण इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना मराठी लेखनातील होणाऱ्या चुकांचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे व विविध उपक्रमांची अंमलबजावणी करून योग्य शुध्दलेखनाचा विकास घडवून आणण्यासाठी जाणिवपुर्वक प्रयत्न केलेला आहे.

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने प्रायोगिक पध्दतीचा वापर केला असून माहिती संकलनासाठी पुर्वचाचणी व उत्तरचाचणी या साधनांचा वापर केला आहे.

## एकलगट अभिकल्पाची उपयुक्तता :-

प्रस्तुत संशोधनासाठी एकलगट अधिकल्पाची निवड केली. एकाच गटाला पूर्वचाचणी व उत्तरचाचणी दोन भिन्न प्रसंगी दिली असता, सुरूवातीला पुर्वचाचणी देवून विद्यार्थ्यांच्या लेखनातील चुका शोधल्या जातात व त्या नाहीशा करण्यासाठी संशोधकाला विविध उपक्रमाचे आयोजन करून योजनाची परिणामकारकता अभ्यासन्यासाठी पुर्वचाचणी व उत्तरचाचणीतील प्रक्रियांच्या फलांमधील फरकांचे परिक्षण केले जाते.

स्वाश्रयी चलाचा प्रयोग केला नसतांना आलेली आश्रयी चलाची स्थिती व स्वाश्रयी चलाचा प्रयोग केल्यावर त्या स्थितीत होणारा बदल तपासला गेल्यावर याबदलाचे श्रेय स्वाश्रयी चलाला दिले गेले.

पुर्वचाचणीत प्रायोगिक उपक्रमांचा अभाव असल्याने सामान्य स्थिती दिसली.उत्तरचाचणी पुर्व प्रायोगिक उपक्रमांच्या विशिष्ट मात्रेमुळे उत्तरचाचणीत परिणाम दिसून येतो/आला.

## चाचणीचे विश्लेषण व पध्दती :-

संशोधकाने प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेल्या गटाकडून चाचणीच्या स्वरूपात उतारा विद्यार्थ्याकडून लिहून घेतला. या उताऱ्यात संशोधकाला अनेक प्रकारच्या चुका आढळून आल्या. त्या चाचणीच्या चुकांचे विश्लेषण पुढीलप्रमाणे

१. मुळाक्षरे योग्य न लिहिता येणे.
२. अक्षरांना स्वरचिन्ह न जोडता येणे.
३. 'उ' कार देण्याच्या चुकीच्या पध्दती.
४. शब्दातील अक्षरे गाळणे.
५. ऱ्हस्व, दीर्घ चुका.
६. 'र' जोडतांना होणाऱ्या चुका.
७. श्र, ज्ञ, क्ष इ. जोडाक्षर लेखनातील चुका.
८. अनुस्वारातील चुका.
९. शब्दांमध्ये आवश्यक त्या ठिकाणी पायमोड विसरणे.
१०. योग्य विरामचिन्हाचे लेखनात वापर न करणे.

याप्रमाणे चाचणीच्या चुकांचे विश्लेषण केलेले आहे. विश्लेषणाच्या पध्दती मध्ये पुर्वचाचणी मध्ये किती व कोणत्या प्रकारच्या चुका केल्या याचा आढावा घेतला.

सांख्यिकिय विश्लेषण करतांना प्रत्येक विद्यार्थ्याला पुर्वचाचणीतील मिळालेले एकूण गुण व उत्तरचाचणीत मिळालेले एकूण गुण याचाच विचार संशोधकाने गुणोत्तर काढतांना केला.

## सांख्यिकिय परिमाणे :-

सदर संशोधनासाठी संशोधकाने माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यासाठी पुर्वचाचणी व उत्तरचाचणी मध्यमानातील फरकाची त्रृटी काढण्यासाठी सुत्र खालीलप्रमाणे.

$$SE_d = \sqrt{6_2M_1 + 6_2M_1 - 2P126_1M_1 - 6_2M_1}$$

दोन मध्यमानातील फरक काढण्यासाठी पुढील सुत्रांचा वापर केला

$$D_M = M_1 - M_2$$

प्राप्त t गुणोत्तर व स्वाधीनता मात्रा

$$t = \frac{DM}{SE_D}$$ t = t मूल्य किंवा गुणोत्तर

स्वाधीनता मात्रा

$$df = N - 1$$

इ. परिमानाचा वापर करून विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात आले.

## प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष :-

प्रस्तुत संशोधनातील निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत -

१. उच्चारातील फरक न समजल्यामुळे विद्यार्थ्यांकडून न,ण,ग,ष,क्ष अक्षर युक्त शुध्दलेखनात चुका होतात.
२. मुळाक्षरे लेखनात तुलनेने कमी चुका होतात.
३. जोडाक्षरयुक्त शुध्दलेखन करतांना विद्यार्थी जोडाक्षरांचा क्रम चुकतात. उदा. पुस्तक हा शब्द पुस्कत असा लिहितात.
४. 'इ' जोडाक्षरयुक्त शुध्दलेखनात विद्यार्थी सर्वात जास्त चुका करतात.
   उदा. उर्दू हा शब्द उरदू, तीव्र हा शब्द तीवर, ट्राय हा शब्द टराय असे लिहितात.
५. पूर्णविराम, अर्धविराम, स्वल्पविराम या विराम चिन्ह लेखनात विद्यार्थी कमी चुका करतात.
६. ऱ्हस्व, दिर्घ, उकार व ईकारामध्ये जास्त चूका करतात.
७. लेखन विकसनासाठी विविध उपक्रम राबविल्यास विद्यार्थ्यांच्या लेखनात प्रगती होते.
८. विद्यार्थ्यांना मराठी शुध्दलेखनाचे नियम व्यवहारातून सांगितल्यास त्यांचा निश्चितच फायदा होतो.
९. 'र' जोडाक्षर युक्त शब्दाचा नियमित सराव घेतल्यास लेखन बिनचुक होण्यास मदत होते.
१०. लेखन कौशल्याचा नियमित सराव घेतल्यास लेखनात प्रगती घडून येते.

११. विद्यार्थ्यांनी पूर्व चाचणीमध्ये जास्त चुका केल्या, या तुलनेत उत्तर चाचणीमध्ये विविध प्रायोगिक उपाय व उपक्रमांचा अवलंब केल्यानंतर प्रायोगिक उपायांची मात्रा (संपादणूक) उत्तम प्रकारची दिसून आली.

## संदर्भ ग्रंथसूची :-


१. भांडारकर, के. म., (१९९८), सुलभ शैक्षणिक संख्याशास्त्र, नुतन प्रकाशन, पुणे.

२. भिंताडे, वि.रा., (२००३), शैक्षणिक संशोधन पध्दती, नुतन प्रकाशन, पुणे.

३. कर्डीले,वसंतराव आणि महाले, संजीवनी., (२००२),संशोधनात सांख्यिकी तंत्राचे उपयोजन, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशीक.

४. कुंडले, मधुकर., (१९७४), मराठी अध्यापन,विद्या प्रकाशन, पुणे.

५. देशपांडे, प्रकाश आणि पाटोळे एन. के., (१९९४), संशोधन पध्दती, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशीक.

६. वाळंबे, मो. रा., (जून २००१), सुगम मराठी व्याकरण लेखन, नितीन प्रकाशन, पुणे.